RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १५०] बुधवार, डिसेंबर ७, २०२२/अग्रहायण १६, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४६०

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ डिसेंबर, २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९.**

क्रमांक फरोवा-२०२१/प्र.क्र.६२/१३-अे.—महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम,१९६९ (१९६० चा महा.४५) याच्या कलम २१ च्या पोट-कलम (२) च्या खंड (अ), (ब), (ई) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम,१९७६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे, ते, उक्त अधिनियमाच्या कलम २१ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक केल्याप्रमाणे या आधीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

१. या नियमास, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (विनियमन) (सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम,१९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा केला आहे) याच्या नियम ३ मधील, पोट-नियम (१) मधील, "१० रुपयांच्या" या मजकुराऐवजी "दोन हजार रुपयांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या नियम ४ मधील,

(अ) पोट-नियम (१) मधील

(एक) "पाच वर्षाच्या" या मजकुराऐवजी "तीन वर्षाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) "१० रुपयांच्या" या मजकुराऐवजी "सातशे रुपयांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) पोट-नियम (२) मधील, "पाच वर्षाच्या" या मजकुराऐवजी "तीन वर्षाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**हे. गो. म्हापणकर,**
शासनाचे उप सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 7th December, 2022

*NOTIFICATION*

MAHARASHTRA FRUIT NURSERIES (REGULATION) ACT, 1969.

No. Farowa-2021/C.R.62/13-A.—In exercise of the powers conferred by clauses *(a)*, *(b)* and *(e)* of sub-section (*2*) of section 21 of the Maharashtra Fruit Nurseries (Regulation) Act, 1969 (Mah. XLV of 1969), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby make the following rules further to amend the Maharashtra Fruit Nurseries (Regulation) Rules, 1976, the same having been previously published as required by sub- section *(1)* of section 21 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Fruit Nurseries (Regulation) (Amendment) Rules, 2022.

2. In rule 3 of the Maharashtra Fruit Nurseries (Regulation) Rules, 1976 (hereinafter referred to as "the principal rules"), in sub-rule (1), for the words and figures "Rs.10" the words "rupees two thousand" shall be substituted.

3. In rule 4 of the principal rules,

(*a*) in sub-rule (1),

(*i*) for the word, "five years", the words "three years" shall be substituted;

(*ii*) for the words and figures "Rs.10", the words "rupees seven hundred" shall be substituted.

*(b)* in sub-rule (2), for the word. "five years", the words "three years" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. G. MHAPANKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.